


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १४५ ●सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# सत्ता येते पण जातेही लक्षात ठेवा: जरागे पाटील






**बीड । प्रतिनिधी**

आम्ही शांततेत मुंबईला जाणार आणि शातंतेत मराठा आरक्षण घेणार, मराठा समाजावर आलेले संकट मोडून काढणार असं वक्तव्य मनोज जरांगे यांनी केलं. मराठा समाजाच्या सभेमध्ये डीजे वाजवू दिला नाही, पण यापुढे बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. आता ही शेवटची फाईट आहे, अशी मारायची की आरक्षण घेऊनच यायचं असं मनोज जरांगे म्हणाले. बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचं ते करा असं थेट आव्हान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं. सरकारने जर मराठ्यांना आरक्षण दिलं, आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? इथूनच मंत्रालयावर गुलाल उधळतो.

गडबड घोटाळा करु नका. त्यामुळे मराठा समाजावर संकट घोंघावतंय. ते संकट आता मोडून काढायचं आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधाऱ्यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचं नुकसान झालं. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचं वाटोळं झालं. यापुढे आपण विचारांनी चालायचं. बीडमधील मराठा समाज आता एक झाला आहे, गर्व वाटेल असं काम करतोय. आज बीडची गर्दी पाहून सत्ताधारी बेजार झालेत. आता असंच मुंबईला जायचं.

### ● आमदार तुमचा म्हणून पोरांची फी माफ होणार नाही

मनोज जरांगे म्हणाले की, तुमच्या जातीचा आमदार, खासदार आहे म्हणून तुमच्या पोराबाळांची फी माफ होणार नाही, त्याला नोकरी मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मुंबईला यावं. कुणा राजकीय नेत्याचं ऐकून गावात थांबू नका. तुमच्या आमदार, खासदारांना मुंबईला यायला सांगा. सरपंचापासून सगळ्या नेत्यांना मुंबईला यायला सांगा. आता ही शेवटची लढाई असेल.

### ● मुंडेंचे मारेकऱ्यांना धरा

बीडच्या सभेमध्ये पोलिसांनी डीजे वाजवू दिला नाही. त्यावर मनोज जरांगे म्हणाले की, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कुणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीसांनी जर पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलीस जर चुकीचे काम करत असतील तर तसं करू नका. एवढी विनंती करुनही जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला काही करायचं असेल तर त्या महादेव मुंडेच्या मारेकऱ्यांना शोधा.

## भटक्या कुत्र्यांन प्रमाणे मुलींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंची पण 'नसबंदी' करा

### शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची धाडसी भूमिका

**बीड । प्रतिनिधी**

समाजात मुलींच्या छेडछाडीच्या वाढत्या घटनांनी असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी धाडसी भूमिका घेतली असून सुप्रीम कोर्टाने भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीचा घेतलेला निर्णय दाखल देत, मुलींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओं ची पण नसबंदी करून कठोर कारवाई व्हावी, अशी कठोर व धाडसी भूमिका सचिन मुळूक यांनी मांडली. शहर असो वा



ग्रामीण भाग, मुलींच्या छेडछाडीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. शाळा-महाविद्यालयीन तरुणींना वर्गात जाताना, बाजारात खरेदी करताना, अगदी प्रवासादरम्यानही रोडरोमिओंच्या टोमण्यांना वागणुकीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर, मानसिकतेवर आणि आयुष्यावर थेट परिणाम होत आहे. बीडसह राज्यभरात पोलिसांकडून रोडरोमीओंवर कारवाई करण्यात येत असली तरी मुलींच्या छेडछाडीचे प्रकार सुरुच आहेत. रोडरोमिओंना थांबवण्यासाठी कायदे आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी किती प्रभावी होते हा मोठा प्रश्न आहे. मुलींच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांना रोखण्यासाठी केवळ कायदे करणे पुरेसे नाही.

## मनोज जरांगे यांच्या मोर्चावर सीएम फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले, 'त्यांच्या मागण्या...'

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी महायुती सरकारने केलेले काम सर्वांना माहिती आहे. मराठा समाजाला आरक्षण देणारे आमचे सरकार आहे. मागच्या काळात मी मुख्यमंत्री असताना, त्यानंतर शिवसेनेचे मुख्य नेता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना, मराठा समाजाता १० टक्के आरक्षण दिले आहे. ते आरक्षण सुरु आहे. आपण अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दीड लाख मराठा उद्योजक तयार केले असल्याचे देवेंद्र फडणवीस



यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र सरकारने मराठा समाजासाठी खूप मोठ्या प्रमाणात काम केले आहे. पुढेही आम्ही काम करणार आहोत. त्या मुळे या संदर्भात कुणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. पण लोकशाही मार्गाने कुणी आंदोलन करत असेल तर त्यांच्याही मागण्या समजून घेऊ, अशी भूमिका सीएम फडणवीस यांनी मांडली आहे.




*श्रीक्षेत्र संस्थान नारायणगडचे विद्यमान मठाधिपती गुरुवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या बद्दल शिवहार पुंजाराम काळे रा.सुकळी ता.शेवगाव जि.अहिल्यानगर या इसमाने अत्यंत अशलाग्य, आक्षेपाहार्य व निंदनीय विधान करून आमच्या भावना दुखावल्या व दोन जाती समाजामध्ये तेढ निर्माण केल्याबद्दल त्याच्यावर गुन्हा दाखल करून कायदेशीर कार्यवाही करावी या मागणीसाठी शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड येथे पोलीस अधिकारी यांना निवेदन देताना श्रीक्षेत्र नारायणगडाचे विश्वस्त ॲड. महादेवराव तुपे, विश्वस्त प्रा.जे.पी.शेळके, विश्वस्त दिलीपराव गोरे, विश्वस्त राजाभाऊ मस्के, ॲड. योगेश शेळके, ॲड. संतोष घोलप, लक्ष्मण महाराज तकिक, बळीराम जिजा चव्हाण, रावसाहेब रकटे, अशोकराव, पांढरे, महादेव घाटे, सुभाष गोरे, श्रीराम घाटे, नारायण बंगाल व इतर समाज बांधव..!*

## जरांगे पाटलांच्या मुंबई मोर्चात लाखोच्या संख्येने सहभागी व्हा : महेश बेदरे यांचे आवाहान

**गेवराई । प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आवाहन केल्याप्रमाणे सराटे अंतरवाली ते मुंबई मोर्चात व तेथील आंदोलनात कुणब्यांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे व आरक्षण घेऊनच परत यावे असे आवाहन मराठा सेवक महेश बेदरे पाटील यांनी केले आहे.

मराठा आरक्षणाचा लढा महाराष्ट्रात ४० वर्षापासून सुरू आहे दोन वर्षापासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटलांच्या बेमुद उपोषण आंदोलनानंतर शासनाने कुणबी नोंदी शोधण्यासाठी शिंदे समितीची स्थापना करून मराठवाड्यासह महाराष्ट्रातील उर्वरित लाखो समाज बांधवांना कुणबी प्रमाणपत्राचे वितरण करून त्यांचा ओबीसीत समाविष्ट करण्यात आला याचे



श्रेय फक्त संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आहे परंतु नोंदी शोधण्यात काम सुरू असताना अनेक गावात एकाच भावकीतील काही लोकांच्या नोंदी सापडल्या तर काही लोकांच्या नोंदी त्यांच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नोंदी आढळून आल्या नाहीत त्यामुळे ते सर्व समाज बांधव आरक्षणापासून वंचित राहिले आहेत गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक समाज बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळून व्हॅलिडीटी ही मिळालेल्या आहेत व त्याचमुळे अनेक तरुणांना नोकरीमध्ये आरक्षणाचा मोठा फायदा झाला आहे

ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या ज्यांच्या नाही सापडल्या ते सर्व एकाच रक्त नातेसंबंधातील एकाच समूहातील असून शेती हा मूळ धंदा करणारे आहेत त्यामुळे ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्या उर्वरित मराठा समाज बांधवांचा ओबीसी मध्ये समावेश करावा या मागणीसाठी परत एकदा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मुंबईत जाऊन आंदोलन करणार आहेत दिनांक २७ ऑगस्ट रोजी सराटे आंतरवाली येथून लाखो जनसमुदायांच्या सोबत जरांगे पाटील मुंबईला निघणार आहेत.

## गवळीबाबा यात्रेनिमित्त शिवसेनेचे युवा ज़िल्हाप्रमुख गणेश शिराळे यांच्यातर्फे प्रथम बक्षीस

**बीड । प्रतिनिधी**

गवळीबाबा यात्रे निमित्त उमर येथे शिवासनेचे युवा जिल्हा प्रमुख गणेश शिराळे यांच्या मार्फत जंगी कुस्त्यांचे आयोजन करुन प्रथम बक्षीस पाच हजार रुपयाची कुस्ती लावन्यात आले. यावेळी गावातील सरपंच प्रतिष्टीत



नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.यामध्ये रवी परजणे, शुभम परजणे, प्रल्हाद नरनाळे, बापू बहिरवाळ, अशोक लाटे, बालाजी नलावडे, दत्ता मेटे, संभाजी करांडे आदीना बक्षीस वितरण करण्यात आले.

# जिवाशी खेळ बंद न केल्यास थेट जिल्हाधिकाऱ्यांचे दालनातच आंदोलन करू: खुर्शीद आलम

### भेसळयुक्त तुप खवा दुध विरोधात धांडे, मासु, तांबे, पाशा, गुरव ची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात येणाऱ्या काळामध्ये हिंदू मुस्लिम व इतर धर्मियांचे पवित्र असणारे सण उत्सव साजरे होणार आहेत त्याच दरम्यान घराघरांमध्ये फराळाचे व गोडधोड खाद्यपदार्थ तूप दही खव्यापासून तयार होतात, सण उत्सवाच्या काळामध्ये भेसळयुक्त तुप खवा दूध पनीर तयार करणारे अन्न भेसळ टोळी सक्रिय होऊन याचा मोठ्या प्रमाणामध्ये गैरफायदा घेण्याची दाट शक्यता असते आणि सध्याही घेत आहेत. वेळोवेळी अन्नभेसळ अधिकारी बीड यांना या व्यक्तींवर कार्यवाही व्हावी असे निवेदन देऊन सुद्धा सदरील अधिकाऱ्याकडून कसल्याच प्रकारची कारवाई केली जात नाही आणि हे भेसळुक्त माफिया याचाच गैरफायदा घेत हजारो किलो भेसळयुक्त तुप लाखो लिटर दूध हजारो किलो खवा व पनीर



शहरात विक्री करत असतात यामुळे अनेकांना विषबाधा झालेल्या आहेत तरी सुद्धा अन्नभेसळ अधिकारी यांच्याकडून भेसळ करणाऱ्यांवर कसल्याच प्रकारची कारवाई केली जात नाही, म्हणून आज बीड नगरपरिषदेचे आरोग्य रक्षण समीतीचे मा. सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात तर समाजसेवक ॲड.महेश धांडे, नगरसेवक शरीफ मामु,शेषेराव तांबे,कंकालेश्वर मंदिराचे संजय महाराज,जिल्हाध्यक्ष शेख पाशा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज उपजिल्हाधिकारी मार्फत मा. जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब यांना निवेदन देण्यात आले, निवेदनात म्हटले आहे की बीड शहरातील तसेच जिल्ह्यातील प्रमुख असणाऱ्या स्वीट खाद्य पदार्थ विकणाऱ्या व मोठे कारखाने व असे पदार्थ तैयार करणाऱ्या सर्व ठिकाणी रेड मारून खाद्यपदार्थ चांगल्या दर्जाचे आहेत का तपासावे जेणेकरून भेसळुक्त माफियांना चाप बसेल अन्यथा मोठमोठे आजारांना बळी पडून विषबाधाहून मोठी दुर्घटना होऊ शकते .



## थोडक्यात...

### सिंदफणा शाळेला सी.बी.एस.ई. क्लस्टर वॉलीबॉल स्पर्धेत उपविजेतेपद




**माजलगाव । प्रतिनिधी**

एम व्ही एम कॅम्पस, अंधेरी, मुंबई येथे गेल्या आठवड्यात १९ ते २३ ऑगस्ट २०२५ दरम्यान आयोजित या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षे आणि १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींनी सहभाग घेतला होता. १४ वर्षे मुले संघ : शिवराज कंटुले (कर्णधार ) अनंत वायाळ उपकर्णधार , विराज कदम, आदिराज कदम, अनुकल्प वारे, स्वप्नज गादेवाड, ओमकार गुळभिले, कैवल्य सोळंके, रविराज तेलगड, वेदांत तौर, शिवम कापसे या संघाने अप्रतिम कामगिरी करत उपविजेतेपद (द्वितीय स्थान) पटकावले आहे. तरुण खेळाडूंच्या या उत्कृष्ट यशाने संपूर्ण माजलगाव तालुक्यात गर्वाची भावना निर्माण झाली आहे. १९ वर्षे मुली संघ: सानिका सोळंके,(कर्णधार ) श्रावणी तौर, स्नेहल शिंदे, प्रांजल उडान, कीर्ती आर्दड, रेणुका सोळंके, श्रावणी सोळंके या संघाने कठोर मेहनत आणि उत्कृष्ट सांघिक भावनेने खेळत तृतीय स्थान मिळवले आहे. सर्व खेळाडूंनी संघकार्याचा उत्तम नमुना सादर केला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम यांनी सर्व खेळाडूं तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक दीपक माने, पुरुषोत्तम सोळंके वैशाली सोळंके, सचिन मंजुळे यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. खेळाडूंची महिन्यांचा कठोर सराव, समर्पणभाव आणि अविचल संघकार्याची भावना यामुळेच हे गौरवास्पद यश मिळवणे शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.या यशस्वी प्रवासामुळे शाळेच्या क्रीडा विभागाला मोठी प्रेरणा मिळाली असून पुढील शैक्षणिक वर्षात आणखी उत्कृष्ट कामगिरीची तयारी सुरू झाली आहे.

### आष्टी तालुका फोटोग्राफर संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन रानडे यांची निवड



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनची वार्षिक पदाधिकारी निवड बैठक नुकतीच संपन्न झाली यावर आधुनिक फोटोग्राफी तसेच विविध विषयांवर साधक बाधक चर्चा झाल्यानंतर फोटोग्राफर संघटनेची २०२५-२६ या आगामी वर्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यामध्ये आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर सचिन रानडे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली तर कड्यातील सागर ढोले यांची उपाध्यक्ष म्हणून अशोक राऊत हे सचिव संतोष सायकड यांची कोषाध्यक्ष तर खजिनदार म्हणून राजू करांडे यांची निवड करण्यात आली. आष्टी तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने दरवर्षी पदाधिकारी निवड करण्यात येते.शिवाय गतवर्षी घेण्यात आलेल्या विविध कार्यशाळा मार्गदर्शक शिबिरे तसेच आगामी वर्षात आधुनिक काळातील फोटोग्राफी तसेच नवनवीन संकल्पना यावर विचार विनिमय करून पदाधिकारी निवड बैठक संपन्न होते.त्याचाच एक भाग म्हणून जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त या निवडी जाहीर केल्या जातात. ज्यामध्ये आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध फोटोग्राफर सचिन रानडे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली तर कड्यातील सागर ढोले यांची उपाध्यक्ष म्हणून अशोक राऊत हे सचिव संतोष सायकड यांची कोषाध्यक्ष तर खजिनदार म्हणून राजू करांडे यांची निवड करण्यात आली.त्यांच्या या निवडीचे तालुक्यातील सर्व फोटोग्राफर्स बांधवांनी अभिनंदन करत आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त छत्र बोरगाव येथे रिपब्लिकन सेना शाखेचे उद्घाटन संपन्न




**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील छत्र बोरगाव येथे दिनांक २३ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असता प्रसंगी रिपब्लिकन सेना शाखेचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष विजय दादा साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली विजय साळवे यांनी बीड जिल्ह्याची धूरा सांभाळली असून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासह सर्कलमध्ये गाव तिथं रिपब्लिकन सेनेची शाखा स्थापन करून घरा घरात आपला सैनिक निर्माण झाला पाहीजे या स्वच्छ हेतुने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून माजलगाव तालुक्यातील छत्र बोरगाव येथे रिपब्लिकन सेनेच्या शाखेचे उद्घाटन संपन्न झाले असता शाखा अध्यक्षपदी महिपती कदम उपाध्यक्षपदी प्रशांत लांडगे सचिवपदी एस बी कदम संघटक अनिल कसबे कोषाध्यक्ष रोषन भाले सहकोषाध्यक्ष कुनाल कदम सल्लागार बी एस गायकवाड तर प्रसिद्धी प्रमुखपदी एम बी लांडगे यांची निवड करण्यात आली आहे या वेळी तालुकाध्यक्ष वशिष्ठ लांडगे मार्गदर्शक कैलास निसर्गंध दिपकराव जाधव विठ्ठलराव जाधव अरूनराव जाधव बालासाहेब शिंदे वैजनाथ गडसिंग विलास गायसमुद्रे सय्यद अन्वर भाई संतोष खूने विश्वनाथ तोडके साहेबराव टाकणखार वामन पाईक अशोक जाधव सय्यद नाजेर भाई ओमप्रकाश टाकणखार विशाल ससाणे लहु ससाणे हनुमंत मोरे गणेश ढगे मोकिंदा खरात विशाल साळवे आनंद साळवे संपादक प्रचंड सोळंके संपादक परमेश्वर सोळंके (बप्पा ) पत्रकार बाळासाहेब अडागळे पत्रकार अमर साळवे यांची उपस्थिती होती.

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींची अभिमानास्पद कामगिरी

**•क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून अभिनंदन**




**मुंबई । प्रतिनिधी**

कॅनडातील विनीपेग येथे झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. या स्पर्धेत प्रितिका प्रदीप हिने दोन रौप्य पदके, गाथा आनंदराव खडके आणि शर्वरी सोमनाथ शेंडे यांनी कांस्य पदक पटकावत महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे. विशेष म्हणजे गाथा आणि शर्वरी यांनी अमेरिकेच्या संघावर अचूक निशाणा साधत एकतर्फी विजय मिळविला आहे. या यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे. क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे आपल्या संदेशात म्हणाले की, अचूक निशाणा साधून पदकावर कोरलेले भारताचे नाव हा देशवासीय व महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. हे यश अथक परिश्रम, मेहनत, संयम व जिद्दीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. खेळाडूंच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आपली ही ऐतिहासिक कामगिरी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. या विजयामुळे महाराष्ट्रातील युवा खेळाडूंना नवे प्रेरणास्थान मिळाले असून राज्य शासन त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचेही मंत्री यांनी नमूद केले .

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत लोकमत बीड भूमिपूत्र पुरस्काराने विजयकांत मुंडे सन्मानित



**•विजयकांत मुंडेंच्या विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव**

**▶बीड लोकमत भूमिपुत्र पुरस्कार मला प्राप्त झाला.आपण सर्वजणांनी माझ्यावर टाकलेला विश्वास सेवा करण्याची दिलेली संधी त्यामुळेच हे सर्व शक्य झाले.हा सन्मान माझ्यावर प्रेम करणार्या प्रत्येक व्यतिचा आसून हा पुरस्कार तुम्हा सर्वांना अर्पन करत आहे.-विजयकांत मुंडे, माजी जि.प.सदस्य बीड तथा चेअरमन कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि.केज**

**केज । प्रतिनिधी**

राजकारण, समाजकारण, शिक्षण, क्रीडा, आरोग्य, प्रशासन, कृषी, उद्योग, वैद्यकीय अशा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकमत भूमिपुत्र पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी बीड जिल्यातील केज तालुक्यातून विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृष्णा अर्बन बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांना लोकमत भूमिपुत्र पुरस्काराने राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, माजी मंत्री एडिटर इन चीफ लोकमत मीडियाचे राजेंद्र दर्डा व संपादक नंदकुमार पाटील सर यांच्या शुभहस्ते बीड भूमिपूत्र पुरस्काराने छत्रपती संभाजीनगर येथे सन्मानित करण्यात आले.

ऐतिहासिक भूमितील कार्यसम्राटांचा गौरव बीड लोकमत भूमिपुत्र पुरस्कार नूकतेच जाहीर करण्यात आले होते.शनिवार दिनांक - ४:४५ वाजता लोकमत भवन जालना रोड छत्रपती संभाजीनगर येथे राजस्थानचे महामहिम राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे व माजी मंत्री एडिटर इन चीफ लोकमत मीडियाचे मा.राजेंद्र दर्डा, संपादक नंदकुमार पाटील सर यांच्या शुभहस्ते राजकारण, समाजकारण, शिक्षण, प्रशासन, सहकार, व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल विडा गटाचे लोकप्रिय माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृष्णा अर्बन को. ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन मा. विजयकांत मुंडे व प्रा.माधुरीताई मुंडे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## एमपीएससी च्या अपात्र खेळाडू विद्यार्थ्यांना मॅट न्यायालयाचा दिलासा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दि. २१ ऑगस्ट २०२५ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र गट-क (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षेसाठी जाहीरात आयोजित केलेली होती. सदर परीक्षा प्रक्रियेमध्ये एकूण १३३३ पदे समाविष्ट होती. सदर परिक्षेमध्ये खेळाडू विद्यार्थ्यांसाठी काही जागा आरक्षीत होत्या. अंदाजे १ लाख विद्यार्थ्यांनी या परिक्षेसाठी अर्ज दाखल केलेले होते. सदर परिक्षेचा पुर्व परिक्षेचा ऑनलाईन अर्ज दाखल करतेवेळी खेळाडू पडताळणी प्रमाणपत्र दाखल करणे हे आयोगाच्या नियमांनुसार तसेच आयोजित जाहीरातीनुसार अपेक्षित होते. ब-याच विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल करतेवेळी चुकीची प्रमाणपत्रे अथवा फक्त प्राविण्य खेळाडु प्रमाणपत्रे जोडुन अर्ज लोकसेवा आयोगाकडे सादर केले. सदर विद्यार्थी अथक परिश्रमातुन पुर्व परिक्षा उत्तीर्ण झाले. खेळाडू प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी कट ऑफ (सीमा रेषा) ही २९.५० अशी जाहीर झाली. उत्तीर्ण यादी जाहीर झाल्यानंतर जवळपास २००० विद्यार्थ्यांनी त्यांचे नाव यादीत न दिसल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे धाव घेतली. तद्नंतर आयोगाने विद्यार्थ्यांना ते मुख्य परिक्षेसाठी तसेच पुढील निवड प्रक्रियेमध्ये चुकीचे खेळाडू प्रमाणपत्र दाखल केल्याचे कारण सांगुन अपात्र असल्याचे घोषित केले.

३४ विद्यार्थ्यांनी या अपात्रतेच्या निकालाविरोधात नाराजी व्यक्त करत ॲड. शशिकांत शेकडे यांच्यामार्फत महाराष्ट्र प्रशासकीय प्राधीकरण खंडपीठ औरंगाबाद (मॅट) यांच्याकडे याचिका दाखल केली.

## गुलाबी बोंड अळीचे वेळीच नियंत्रण करणे गरजेचे : प्रा. महेश आखरे



**पाचेगाव । प्रतिनिधी**

गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव डोंमकळयाच्या स्वरूपात ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयापासुनच दिसुन येतो. सततचे ढगाळ वातावरण पिकावरील किडींना पोषक असते. किडीच्या व्यवस्थापनामध्ये उशिर केल्यास या किडीचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढण्याची शक्यता असते, त्यामुळे गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन वेळेत करणे गरजेचे आहे असे प्रा. महेश आखरे शेतकरी चर्चा सत्र मध्ये बोलत होते. मौजे पाचेगाव येथे ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात कोरोमंडल इंटरनॅशनल मार्फत शेतकऱ्यासाठी कापूस पिकातील अन्नद्रव्य तसेच बोंड अळी व्यवस्थापन याबाबत चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला पाचेगाव चे सरपंच बाळासाहेब प्रधान, कोरोमंडल चे कृषि शास्त्रज्ञ प्रा. महेश आखरे, विपणन अधिकारी ललितकुमार पाटील उपस्थित होते. शेतामध्ये कापूस पिकाची न उमलणारी फुले/पाते म्हणजे डोम कळी, अश्या डोमकळ्या शेतात दिसल्यास शेतकऱ्यांनी ताबडतोब डोमकळ्या जमा करून शेतपासून दूर गड्यात टाकून नष्ट कराव्यात. शेतामध्ये गुलाबी बोंड अळी साठीचे कामगंध सापळे , तसेच लाईट सापळे लावल्यास येणारा गुलाबी बोंड अळीचा धोका बऱ्या प्रमाणात शेतकरी कमी करू शकतात या बाबत प्रा. महेश आखरे यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. गुलाबी बोंड अळीचा जास्त प्रादुर्भाव दिसल्यास शिफारशीत कीटकनाशकाची तात्काळ फवारणी घेण्याचा, तसेच फरदड टाळण्याचा सल्ला सुद्धा प्रा. महेश आखरे यांनी शेतकऱ्यांना दिला. कापुस पिकात होणारी पाते गळ व पाते गळ न होऊ नये म्हणून करायच्या उपाययोजना, तसेच अन्नद्रव्य व्यवस्थापन याबद्दल ललित पाटील यांनी माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अमोल शेलार यांनी केले.

## आत्माराम वाव्हळ यांना 'जननेता सन्मान २०२५ पुरस्कार' जाहीर ; सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

**१५ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या हस्ते होणार वितरण!**



**बीड । प्रतिनिधी**

सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिना निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य करणार्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे श्री आत्माराम वाव्हळ सर यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. सायं दैनिक जननेताच्या प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना जननेता सन्मान २०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे. या मध्ये विद्यार्थ्यांना घडविण्याचे व ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असताना पत्रकारितेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक कार्यात सदैव सहभागी असणारे राज्यातील विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासह इतर प्रश्नावर सातत्याने लढा देणारे महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष तथा शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक तसेच आदर्श पत्रकार, संपादक या विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले श्री आत्माराम वाव्हळ यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची जननेता सन्मान २०२५ या पुरस्कारासाठी करण्यात आल्याची माहिती निवड समितीचे प्रमुख संपादक नंदू गायकवाड यांनी दिली. सदर पुरस्काराचे वितरण दि. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. सदरील दैनिक जननेता सन्मान २०२५ पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री आत्माराम वाव्हळ सर यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## माजलगाव येथे अमृत मेळावा उत्साहात शिक्षण, कौशल्य आणि उद्योग - एकच व्यासपीठावर



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्र' पार पडले. विविध शैक्षणिक योजना, कौशल्यविकास उपक्रम आणि उद्योगासाठी उपलब्ध संधींची माहिती एकाच व्यासपीठावर देणारा हा मेळावा उत्साहात रंगला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमातेच्या पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व योजनांची माहितीपुस्तिका देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी तहसीलदार संतोष रुईकर यांनी मेळाव्याचे उद्घाटन करत मार्गदर्शन करताना सांगितले की, शासन सर्वांसाठी विविध योजना घेऊन आलेले आहे.

## गुरु माऊलींच्या आशीर्वादाने भगवंतापर्यंत जाता येते

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या जीवनामध्ये गुरुचे स्थान हे उच्चतम स्थान आहे .गुरुच्या अनुग्रहा शिवाय भगवंतप्राप्ती होत नाही. गुरु अनुग्रह देतात व आपल्या जीवनातील अंधकार दूर करतात गुरुच्या आशीर्वादा वरच भगवंताची प्राप्ती होते असे अनमोल विचार श्री. १०८ प.पू.ष.ब्र शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी येथे आयोजित शिष्यांना उपदेश पर प्रवचनामध्ये अनमोल विचार प्रतिपादित केले. आपल्या प्रवचन सेवेमध्ये प.पू.ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी गुरु सेवा ,भगवंत सेवा व आपल्या जीवनात गुरुचे अनन्य महत्त्वाचे स्थान आहे हे सांगताना महाराजांनी श्रोत्यांना ज्याप्रमाणे मातीचा माठ बनवण्यासाठी मातीची गरज आहे.

# पुणे येथे अखिल भारतीय मराठा महासंघाची मध्यवर्ती कार्यकारणी सभा संपन्न



**पुणे । प्रतिनिधी**

मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.राजेंद्रजी कोंढरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या काळामध्ये महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये मराठा महासंघाची मजबूत अशी बांधणी करण्यासाठी व मराठा समाजातील गाव खेड्यातील व वस्तीवरील मराठा समाजातील बांधवांना मदत व विविध शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मराठा महासंघ इथून पुढे रूपरेषा आखून दिली जाईल अशा सूचना यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्रजी कोंढरे साहेब यांनी सूचना केल्या, यावेळी या मध्यवर्ती कार्यकारणीच्या बैठकीला उपस्थित राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्षश्री. नरेंद्र पाटील यांनीही मनोगत व्यक्त केलं त्यांनी जमलेल्या कार्यकर्त्यांना प्रत्येक जिल्ह्यामध्ये वर्षाला एक मिनिमम प्रोग्रॅम लावण्याच्या सक्त सूचना दिल्या त्यांच्या या सूचनाच जो पदाधिकारी पालन करणार नाही त्याला संघटनेतून बाहेर काढण्यात येईल असेही सूचना आजच्या बैठकीत करण्यात आल्या या बैठकीला उपस्थित संयुक्त राष्ट्रीय सरचिटणीस प्रकाश देशमुख राष्ट्रीय कोषाअध्यक्ष प्रमोद जाधव राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक नाना गुलाब दादा गायकवाड युवराज दिसले मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंखे जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर कवचट जिल्हा सरचिटणीस बंडू आप्पा कोलंगडे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव हिंदोळे शहर अध्यक्ष दत्ता शेळके व महाराष्ट्रातून बहुसंख्येने मराठा महासंघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.